# हरहुन्नरी मुलांचा शोध-प्रकल्प!

**आयोजक**

Institute For Psychological Health (IPH)

आणि **'वयम्'** मासिक

प्रिय 'वयम्' वाचक,

सप्रेम शुभेच्छा!

पहिल्याच वर्षी जबरदस्त यशस्वी ठरलेली 'बहुरंगी बहर' स्पर्धा आपण यंदाही आयोजित करीत आहोत. तुम्हांला आवडेल आणि सहभागी व्हायला मजा येईल अशी ही स्पर्धा! थोडक्यात, बहुअंगाने बहरत असलेल्या मुलांची स्पर्धा!

तुम्ही विचाराल, नेमकी कोणासाठी आहे ही स्पर्धा?... महाराष्ट्रातील इयत्ता सातवी ते नववीतील हरहुन्नरी विद्यार्थी-विद्यार्थिनी या स्पर्धेत सहभागी होऊ शकतात. आता प्रश्न येईल की, 'हरहुन्नरी' म्हणजे नेमके कोण कोण?

या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठीच हे पत्र-

'बुद्धिमत्ता' म्हणजे नेमके काय, ह्या प्रश्नाचे उत्तर, काळानुसार येणाऱ्या शास्त्रीय माहितीच्या आधारे बदलत गेलेले आहे. गेल्या शतकामध्ये जसजसा मानसशास्त्राचा आणि शिक्षणशास्त्राचा विकास होऊ लागला, तसतसे बुद्धिमत्ता म्हणजे नेमके काय आणि ती कशी मोजावी, अशा समस्या संशोधकांसमोर आल्या. तर्कशुद्ध विचार करण्याची क्षमता, गणिती विचार करण्याची क्षमता, व्यवहाराचे आकलन, सामान्यज्ञान, अडचणींची उकल करण्याचे कसब अशा अनेक गुणांचा अंतर्भाव 'बुद्धिमत्ते'मध्ये केला गेला. त्या आधारे अनेक IQ टेस्ट म्हणजे बुद्धिमापन चाचण्याही उपयोगात आल्या.

हळूहळू लक्षात येऊ लागले की, बुद्धिमत्ता काही एवढ्यापुरती मर्यादित नाही. कारण अशा मोजमापांमध्ये उत्कृष्ट असलेले अनेकजण प्रत्यक्ष जीवनात यशस्वी ठरतातच असे नाही. अशा निरीक्षणांमुळे दोन विषयांमधल्या संशोधनाला गती मिळाली.

पहिला विषय आला, 'भावनांक': भावनिक दृष्टीने जी व्यक्ती अधिक सक्षम, ती यशस्वी आणि आनंदी होण्याची शक्यता जास्त! भावनिक स-क्षमता येते कशातून? स्वतः च्या आणि इतरांच्या भावनांची जाण, त्यांचा स्वीकार आणि त्यानुसार केलेले अनुरूप वर्तन! संस्कृतमधला 'प्रज्ञा' हा शब्द

पारंपरिक व्याख्येतील बुद्धिमत्ता आणि उत्तम भावनांक यांच्या संयोगासाठी वापरला आहे.

दुसरा विषय म्हणजे, 'Theory of Multiple Intelligence' अर्थात 'बहुरंगी बुद्धी'! तबल्याच्या लयतालाचं गणित सहज आत्मसात करणारे मूल पुस्तकी गणितात कच्चे ठरते... एखाद्या क्रीडाप्रकारामध्ये अप्रतिम कौशल्य दाखवणारी व्यक्ती डबल ग्रॅज्युएट असायलाच हवी असं नाही... कुठल्याही बिझनेस स्कूलमध्ये शिक्षण न घेता, कर्तृत्ववान उद्योजक बनता येतं... व्यवहारामध्ये सतत दिसणाऱ्या अशा अनेक उदाहरणांनी हे सिद्ध केले की, बुद्धीच्या व्याखेला पारंपरिक चौकटीतून मुक्त केले पाहिजे. संशोधकांनी बुद्धिमत्तेचे साठाच्यावर Flavours शोधले. काही जण अंकांबरोबरची बुद्धिमत्ता घेऊन येतात (प्रा. रामानुजन), तर काही सूर–लयीची बुद्धिमत्ता (लता मंगेशकर), काहीजण यंत्राबरोबर तन्मयतेने आणि सहजपणे काम करू शकतात, तर काहीजण माणसांबरोबर... काहींची बुद्धी कोणत्याही क्षेत्रातील सिद्धान्तांना हात घालते, तर काहीजण त्या सिद्धान्ताचा व्यवहारात उपयोग करीत एखादे उपकरण तयार करतात.

गंमत म्हणजे, कधीकधी काही माणसे एका पद्धतीच्या बुद्धिमत्तेमध्ये प्रचंड पारंगत असतात, पण त्यात समतोल असतोच असे नाही... म्हणजे उत्तम शास्त्रज्ञ हा व्यवहाराला कुचकामी ठरू शकतो, तर अत्यंत निर्मितिक्षम कलावंत काही वेळा जवळच्या नातेवाइकांना ओळखूसुद्धा शकणार नाही.

म्हणजे ज्या व्यक्तीमध्ये बुद्धीचे एकापेक्षा जास्त Flavours आहेत आणि त्या व्यक्तीचे आयुष्य सर्वांगाने फुलून येते, तो/ती जगण्याचा आनंद तर लुटतेच, शिवाय समाजालाही योगदान देऊ शकते.

म्हणून अनेक विषयांचे ज्ञान आणि भान ज्यांना आहे आणि काही विषयांमध्ये प्रावीण्य मिळवण्याची शक्यताही त्यांच्यात आहे, अशा विद्यार्थ्यांना शोधले पाहिजे. त्यांच्या विकासासाठी खास प्रयत्नही करायला पाहिजेत. अशा बहुरंगी बुद्धीचा बहर – स्पर्धा, परीक्षा, टक्केवारी, ॲडमिशन यांच्या हल्ल्याने गळून किंवा कोमेजून जाता कामा नये.

या सगळ्या विचारातूनच गेल्या वर्षी या प्रयोगाचा जन्म झाला. आपण जरी ह्या उपक्रमाला 'स्पर्धा' असे नाव दिले असले तरी, तो एक शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि मानसशास्त्रीय प्रकल्प आहे असे म्हटले तरी चालेल. उमलत्या वयामध्ये व्यक्तिमत्त्वाचे असे बहरते पैलू समाजापुढे आले, तर अशा इतर विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळेल. या उपक्रमामध्ये उत्तम कामगिरी करणाऱ्या मुलांसाठी भविष्यामध्ये खास विकासशिबिरे, गुणवत्तावर्धक मार्गदर्शन अशा योजना आहेत. गेल्या वर्षीच्या विजेत्यांनी अलीकडेच एका विकास–शिबिराचा अनुभव घेतला.

या उपक्रमाचे स्वरूप नेमके कसे आहे आणि त्यातील पहिल्या टप्प्यावरची प्रश्नावली अशी सर्व सविस्तर माहिती 'वयम्'च्या या अंकामध्ये आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक विश्वामध्ये 'एकमेवाद्वितीय' असलेल्या या प्रकल्पाला विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांचा उत्तम प्रतिसाद मिळेल, असा आम्हांला विश्वास आहे. पहिल्या वर्षीचा प्रतिसाद प्रोत्साहक होता. यंदा त्याहीपेक्षा जास्त प्रतिसाद मिळेल, अशी आशा आहे.

शुभदा चौकर
मुख्य संपादक, 'वयम्'

डॉ. आनंद नाडकर्णी
कार्यकारी विश्वस्त, IPH




हरहुन्नरी मुलांचा
शोध–प्रकल्प!

**दुसरी फेरी– गटचर्चा**
**२३ सप्टेंबर 'वयम्' ठाणे**

**तिसरी फेरी– मुलाखत**
**२४ सप्टेंबर ठाणे**

**अंतिम फेरीत अनेक मान्यवरांना भेटण्याची संधी!**

## प्रवेशिका पाठवताना हे लक्षात घ्या–

१. सर्व प्रश्नांची उत्तरं लिहिणं अपेक्षित आहे. शक्यतो कोणताही प्रश्न वगळू नये.

२. प्रश्नांची उत्तरं स्वतंत्र कागदावर, कागदाच्या एकाच बाजूला, चारही बाजूंना समास सोडून सुवाच्य अक्षरांत लिहा.

३. उत्तरं तुमच्या मनातील असणं अपेक्षित आहे. त्यामुळे अन्य कोणालाही त्यांत लुडबुड करू देऊ नका.

४. तुमची उत्तरं आमच्याकडे सुरक्षित राहतील, ती आम्ही कोणालाच कळू देणार नाही.

५. उत्तरपत्रिकेबरोबर प्रमाणपत्रं जोडू नका.

६. उत्तरपत्रिका इमेलने पाठवणार असल्यास PDF किंवा हस्तलिखित स्कॅन करून पाठवा.

७. उत्तरं मराठी / इंग्लिश किंवा मिंग्लिश भाषेत चालतील.

८. मुद्दाम शेवटच्या तारखेपर्यंत न थांबता उत्तरं लिहून झाल्यावर लगेच पाठवा.

९. उत्तरपत्रिका 'वयम्' कार्यालयात पाठवावी. पत्ता– 'बहुरंगी बहर' 'वयम्' न्यू वंदना को.ऑप.हा.सो., ३रा मजला, लालबहादूर शास्त्री मार्ग, वंदना सिनेमाजवळ, ठाणे– ४००६०२, दूरध्वनी : ०२२–२५९८६२७०/७१/७२/७३
**इमेल–** iphwayamspardha17@gmail.com

१०. उत्तरपत्रिका १५ ऑगस्टपर्यंत पोहोचेल, याची काळजी घ्या.

११. परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

१२. दुसरी व तिसरी फेरी ठाणे शहरात होईल. पहिल्या फेरीतून दुसऱ्या व तिसऱ्या फेरीसाठी निवडल्या गेलेल्या विद्यार्थ्यांना, ठाण्यापर्यंत येण्या–जाण्याचा आणि राहण्याचा खर्च व सोय स्वतः करावी लागेल.

# मी असा... / मी अशी... (व्यक्तिगत माहिती)

१. नाव–

२. मुलगा / मुलगी–

३. जन्मदिनांक– वय–

४. घरचा पत्ता आणि संपर्क क्रमांक –

५. इयत्ता– इमेल–

६. शाळेचे नाव–

७. शाळेचा पत्ता व संपर्क क्रमांक –

८. शिक्षणाचे माध्यम–

९. पालकांचे वय– वडील– व्यवसाय–

आई– व्यवसाय–

१०. तुमची भावंडे– नावे आणि वय–

११. कुटुंबातील इतर व्यक्ती / त्यांचे तुमच्याशी नाते–

१२. तुमच्या आवडीच्या गोष्टी–
अ. अभ्यासक्रमातील–
ब. अभ्यासेतर–

१३. आवडीच्या गोष्टींपैकी खास कौशल्य कशाकशात आहे?

१४. यांपैकी कशात तुम्ही प्रावीण्य मिळवले आहे? (सूचना– पारितोषिके, स्पर्धेतील यश, परीक्षा यांचा तपशील लिहावा, मात्र प्रमाणपत्रे जोडू नयेत.)

१५. तुमच्या घरात असलेली प्रमुख इलेक्ट्रॉनिक उपकरणे–

१६. यांपैकी तुम्हांला प्रचंड आवडणारी उपकरणे कोणती?–

१७. तुमचा आवडता चित्रपट–




१८. तुमची आवडती टीव्ही मालिका आणि कार्यक्रम कोणता?

१९. तुमच्या आवडीची दोन गाणी कोणती?

२०. तुमच्या आवडीची दोन पुस्तके–

२१. तुमचे आवडते साहित्यिक–

२२. आजच्या काळातील तुमचे आदर्श कोण? का?

२३. माझे मोबाइलशी असलेले नाते–
(यांपैकी योग्य वाटणाऱ्या पयार्यांना बरोबरची खूण करा.)
अ. जवळचा खेळगडी ( )
ब. हवासा वाटणारा, पण अजून माझ्याकडे नसणारा ( )
क. दुसऱ्यांच्या हातात बघितलेली वस्तू ( )
ड. असा मित्र, जो मी दुसऱ्या कुणास देणार नाही. ( )

२४. रविवारची सुट्टी तुम्हांला कशी घालवायला आवडेल?

२५. तुमचा आवडता देव कोणता? का?

२६. तुमचा आवडता सण कोणता? का?

२७. तुमच्या आवडीचे तीन खाद्यपदार्थ कोणते?

२८. तुमच्या स्वभावातील तुम्हांला आवडणारा एक गुण–

२९. तुमच्या वागण्यातील न आवडणारी एक गोष्ट–

३०. आणखी १० वर्षांनंतर मी कुठे असेन? काय करत असेन? माझे व्यक्तिमत्त्व कसे असेल? – प्रत्येकी दोन वाक्यांत लिहा.

# अंतरंग

३१. सातवीतील माधवी आणि आसावरी यांची गेली अनेक वर्षं त्यांच्या कॉलनीतील आकाशशी चांगली मैत्री आहे. आकाश आता नववीत आहे. अलीकडे माधवीला जाणवलंय की, आसावरी व आकाश तिला टाळत आहेत आणि एकमेकांसोबत राहणे पसंत करत आहेत. माधवीला वाईट वाटतेय, पण ती त्या दोघांशी काही स्पष्टपणे बोलत नाही. माधवीला त्या दोघांचा मनातून खूप राग येतोय. ती एकटी एकटी राहतेय. माधवीच्या या वागण्याबद्दल तुम्हांला काय वाटते? (जास्तीत जास्त ३० शब्दांत लिहा.)

३२. जितके जास्त शिक्षण, तितकी समज जास्त, असं सर्वजण म्हणतात. त्याची काय काय कारणं असतील, असं तुम्हांला वाटतं?

अ. शिक्षणामुळे विचारांना दिशा मिळते. – ( )

ब. शिक्षण आणि समज यांचा काहीही संबंध नाही. – ( )

क. शिक्षण मिळाले की, माणूस आपले म्हणणे प्रभावीपणे मांडू शकतो. – ( )

ड. शिक्षणाबरोबरच योग्य अनुभव मिळाल्याशिवाय समज वाढत नाही. – ( )

(यांपैकी योग्य वाटणाऱ्या एक वा अधिक पर्यायांना बरोबरची खूण करा.)

३३. दोन व्यक्तींमध्ये स्नेहाचे नाते निर्माण व्हायचे असेल तर त्या दोघांमध्ये कोणते गुण असायला हवेत? त्यांच्या वागण्या–बोलण्यामध्ये काय दिसून यायला हवे? (जास्तीत जास्त ३० शब्दांत लिहा.)

३४. तुमच्या शाळेतील स्वच्छतागृह स्वच्छ राहात नाहीं, असा अनुभव आहे. रोज सकाळी ते चकाचक असते. पण दिवसभरात अतिवापराने ते अस्वच्छ होते. स्वच्छता राखण्यासाठी तुम्ही कोणते उपाय सुचवाल? (जास्तीत जास्त ३० शब्दांत लिहा.)

३५. आंतरशालेय स्पर्धेसाठी तुमच्या शाळेतर्फे प्रकल्प करून पाठवायचा आहे. तुम्ही प्रकल्प–प्रमुख आहात. तर विषय कसा निवडाल? का?

अ. तुमच्या कल्पनेतील विषय शिक्षकांना सांगून पटवून द्याल. – ( )

ब. शिक्षकांनी सांगितलेलाच विषय घ्याल. – ( )

क. वर्गातील इतरांच्या कल्पनेप्रमाणे विषय निवडाल? – ( )

ड. इंटरनेटच्या आधारे विषय निवडाल? – ( ) (एक वा अधिक पर्यायांना बरोबरची खूण करा आणि त्याची कारणे जास्तीत जास्त ३० शब्दांत लिहा.)




३६. जंक फूड खाण्याचे तीन फायदे आणि तीन तोटे लिहा. (जास्तीत जास्त ३० शब्दांत लिहा.)

३७. कल्पना करा– तुमच्या एका गरीब मित्राला तुम्ही नेहमी वह्या–पुस्तके घेऊन देता. पण अलीकडे तुमच्या लक्षात आलंय की, तो त्याचा नीट वापर करत नाही. तुम्हांला जाणवतंय की, अभ्यासात त्याचे लक्ष नाही. तरी या वर्षीही तुम्ही त्याला मदत कराल का? (जास्तीत जास्त ३० शब्दांत लिहा.)

३८. तुम्हांला काय वाटतं, तुमचे निर्णय घ्यायला तुम्ही समर्थ आहात का? हे सामर्थ्य कसे कमवायचे, असे तुम्हांला वाटते? (जास्तीत जास्त ३० शब्दांत लिहा.)

३९. परीक्षा जवळ आली की घरातील टीव्ही बंद केला जातो. मला वाटते की, रोज अर्धा तास टीव्ही बघावा. हे मी पालकांना कसे पटवीन? (जास्तीत जास्त ३० शब्दांत लिहा.)

४०. असे समजा की, तुमच्या घरी गेल्या सहा महिन्यांत पुढील घटना घडल्या आहेत–

अ. आई आणि तिच्या बहिणीमध्ये भांडण झाल्यामुळे आईचा मूड वाईट झाला आहे.
ब. वडिलांना बीपी आणि डायबेटीस आहे, असे कळले आहे.
क. ताई फॅशन करू लागली आहे.

या घटनांबद्दल तुम्हांला काय वाटते आहे आणि अशा परिस्थतीत तुम्ही काय कराल, ते प्रत्येकी (जास्तीत जास्त २० शब्दांत लिहा.)

४१. ही कामे तुम्हांला येतात का? तुम्ही ती आठवड्यातून किती वेळा करता?

अ. डाळ–भात करणं.
ब. बँकेत जाऊन एखादा व्यवहार करणं.
क. बाजारातून भाजी–फळं आणणं.
ड. स्वतः च्या वस्तू नीट जागेवर ठेवणं.

४२. घरात 'कुटुंबप्रमुख' ही संकल्पना असावी की नसावी? (जास्तीत जास्त ३० शब्दांत कारणासह लिहा.)

४३. समजा, एक शिक्षक वर्गामध्ये सर्वांसमक्ष तुमची टर उडवत आहेत. अशावेळी तुमची प्रतिक्रिया काय असेल? (जास्तीत जास्त ३० शब्दांत लिहा.)

४४. आणि वरील प्रतिक्रिया कधी द्याल? (एका पर्यायाला बरोबरची खूण करा.)

अ. ताबडतोब ( )

ब. दहा दिवसांनंतर ( )

क. कधीच नाही ( )

ड. परत संधी मिळेल तोवर थांबेन ( )

४५. 'आरामात मिळत असतील गोष्टी, तर श्रम करायचे कशाला?'– या वाक्याच्या बाजूने आणि विरोधात जास्तीत जास्त ३० शब्दांत लिहा.

४६. तुम्हांला यंदा जास्त अभ्यास करूनसुद्धा सहामाही परीक्षेत चांगले मार्क्स मिळाले नाहीत. तुम्हांला शिक्षकांनी शिकवलेले धडे पटकन समजतात, पण परीक्षेत काय होते, ते कळत नाही, तर वार्षिक परीक्षेसाठी तुम्ही कशी तयारी कराल? (जास्तीत जास्त ३० शब्दांत लिहा.)

४७. पुढील घटनांबाबत तुमच्या घरी काय मते असतात? (प्रत्येकी एकेका वाक्यांत लिहा.)

अ. तुम्हांला नियमितपणे कँटीनमध्ये खायला देणे.

ब. तुम्हांला स्मार्टफोन वापरायला देणे

क. तुम्हांला पॉकेटमनी देणे

ड. तुम्हांला फॅशनेबल कपडे घालायला देणे

४८. तुमची आई सध्या रोज थकून घरी येत आहे. आल्यावर ती घरी चिडचिड करतेय. तुम्हांला उगाच ओरडतेय. अशा वेळी तुम्ही कसे वागाल? (जास्तीत जास्त ३० शब्दांत लिहा.)

४९. तुम्ही जिथे खोटे बोललात असा एक प्रसंग लिहा. असे बोलण्यामागे काय कारणे होती, तेही लिहा. (जास्तीत जास्त ३० शब्दांत लिहा.)




ही प्रश्नपत्रिका खालील वेबसाइटस्‌वरही आहे–
www.wayam.in
www.healthymind.org

५०. तुमचा जवळचा मित्र/मैत्रीण तुमचे गाव/शहर सोडून दुसरीकडे जाणार आहे. त्यापूर्वी तुम्ही त्याला/तिला घरी जेवायला बोलावले आहे. कसे असतील ते दोन तास... डोळ्यांसमोर आणा आणि त्याबद्दल जास्तीत जास्त ३० शब्दांत लिहा.

५१. एखाद्याने मला सांगितलेले सिक्रेट मी कायम खासगी ठेवतो / ते... कारण–

अ. त्यामुळे मला सर्वांची सिक्रेट्स माहीत होतात. ( )
ब. माझ्या घरच्यांनी माझ्यावर तसेच संस्कार केलेले आहेत. ( )
क. मी सिक्रेट न पाळल्यास ती व्यक्ती माझ्यावर विश्वास ठेवणार नाही. ( )
ड. सिक्रेट न पाळणं हे पाप आहे. ( )
इ. मी चुकून सिक्रेट उघड केले तर मी अत्यंत अस्वस्थ होतो / ते. ( )

(यांपैकी योग्य वाटणाऱ्या एक किंवा अधिक पयार्यांना बरोबरची खूण करा.)

५२. ‘स्वप्न’ या विषयाची तुमची व्याख्या काय? (जास्तीत जास्त २० शब्दांत लिहा.)

५३. तक्ता पूर्ण करा–

| प्रसिद्ध व्यक्तीचे नाव | आवडलेला गुण | न पटलेली गोष्ट |
|---|---|---|
| नरेंद्र मोदी | | |
| अमिताभ बच्चन | | |
| सचिन तेंडुलकर | | |
| प्रियांका चोप्रा | | |
| मुकेश अंबानी | | |

५४. तुमच्या शाळेची शैक्षणिक सहल आहे. त्याच दिवशी आत्याकडे घरगुती समारंभ आहे. आई–बाबांचा आग्रह आहे की, तुम्ही त्यांच्याबरोबर गेलेच पाहिजे. तुम्हांला वाटतंय, शैक्षणिक सहलीला गेले पाहिजे. तुम्ही व तुमचे आई–बाबा यांच्यातील संवाद लिहा. (जास्तीत जास्त ५० ते ६० शब्द)

५५. 'बहुरंगी बहर' प्रकल्पासाठी जाहिरात करून हवी आहे. त्यासाठी तुम्ही पुढील गोष्टी तयार करा–

अ. घोषवाक्य

ब. जाहिरातीची कॉपी

५६. 'टाइमपास'ची तुमची व्याख्या काय? तुम्हांला कोणता 'टाइमपास' सर्वांत प्रिय आहे? (जास्तीत जास्त ३० शब्दांत लिहा.)

५७. लहानपणापासूनचा तुमचा एक वर्गमित्र अचानक वाईट संगतीत अडकून व्यसनात रमतोय, असे तुमच्या लक्षात आले आहे. तुम्हांला त्याबद्दल वाईट वाटतेय. अशा वेळी तुम्ही काय कराल? (जास्तीत जास्त २० शब्दांत लिहा.)

५८. 'आज्ञाधारकपणा' या गुणाच्या बाजूने आणि विरोधात प्रत्येकी २ वाक्ये लिहा.

५९. पुढे दिलेला प्रसंग डोळ्यांसमोर आणा – तुमचा/ची एक मैत्रीण/मित्र नकला छान करतो/करते. त्याला/तिला बॉलीवूड कलाकार व्हायचंय. तो/ती बॉलीवूड कलाकाराप्रमाणे वागतो/ते. त्याला/तिला वाटतेय की, आपले क्षेत्र निश्चित झालेय, त्यामुळे शालेय शिक्षण महत्त्वाचे नाही. तुम्ही त्याला/तिला काय सांगाल? (जास्तीत जास्त ३० शब्दांत लिहा.)

६०. निबंध लिहा १०० ते १५० शब्दांत.

अ. सोशल मिडिया आणि मी

ब. मेरी कोमकडून मी काय शिकलो/ले?

क. टीव्हीवरच्या मालिका– काय खरे, काय खोटे?

ड. मार्कांचे महत्त्व.